**फाईल क्रमांक : संकीर्ण-०१/२०१८/समोवानि** **दिनांक : ०६/०४/२०१८**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# घोषणा

**विषय :- माजी सैनिक उमेदवारांच्या शिफारशीबाबत वस्तुस्थिती.**

सहायक मोटर वाहन निरीक्षक या पदासाठीचा अंतिम निकाल आयोगाने दि.31/03/18 रोजी घोषित केला आहे. त्यामध्ये 832 उमेदवार शिफारस पात्र ठरले आहेत. त्यापैकी माजी सैनिक प्रवर्गातील शिफारसपात्र झालेल्या 124 उमेदवारांपैकी काही उमेदवार (3-4) कमी वयाचे असल्याने ते खरोखरच माजी सैनिक आहेत काय, या विषयी प्रश्न उपस्थित करुन, आयोगाकडून शिफारसींबाबत काळजी घेतली जात नसल्याचा प्रचार गेल्या काही दिवसात समाजमाध्यमातुन व एका वृत्तवाहिनीवरुन केला जात आहे. याबाबत आयोगाच्या परीक्षांना बसणा-या उमेदवारांमध्ये संभ्रम राहू नये यास्तव स्पष्ट करण्यात येते की, या पदासाठी मुलाखती नसल्यामुळे प्रमाणपत्रे तपासणीसाठी उमेदवारांना आयोगाच्या कार्यालयात बोलविले जात नाही. शिफारस केलेल्या उमेदवारांची **नेमणुक करण्यापूर्वी माजी सैनिक प्रवर्गाच्या व वयाच्या दाव्यासह शैक्षणिक अर्हता, अनुभव, आरक्षण, प्रवर्ग अशा सर्वच दाव्यांची सत्यता पडताळुन खात्री झाल्यानंतरच त्यांना नेमणुका द्याव्यात अशा स्पष्ट सुचना** आयोगाकडून शासनास केल्या जातात. जाहीर निकालामध्येही तशी स्पष्ट टिप दिलेली आहे. इतर उमेदवारांच्या तुलनेत माजी सैनिक उमेदवारांचे वय जास्त असणे अपेक्षित असले तरी, केवळ या प्रवर्गातील काही उमेदवारांचे वय कमी आहे म्हणुन त्यांना पडताळणी न करता बाद करणे योग्य नाही. Short Service Commission वरील अधिकारी किंवा अन्य कारणांनी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या माजी सैनिकांना प्रसंगी अल्पवयात सुद्धा discharge दिला जावू शकतो.

नेमणुकीपूर्वी शिफारसप्राप्त सर्वच उमेदवारांच्या सर्वच दाव्यांची पडताळणी करुन फक्त पात्र आढळणा-या उमेदवारांच्याच नेमणुका शासनाकडून होणार आहेत. शिवाय छाननीत अपात्र ठरणा-या कोणत्याही प्रवर्गातील उमेदवारांऐवजी गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारांच्या शिफारशी शासनाच्या मागणीनंतर, आयोगाकडून प्रतिक्षायादीतुन केल्या जातात. यास्तव आयोगाच्या परीक्षांना बसणा-या उमेदवारांनी अशा अपु-या माहितीवर आधारीत, दिशाभुल करणा-या प्रचारांस बळी पडू नये.

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

ठिकाण :- मुंबई